
गुरुदास नूलकर

# पुण्यातल्या वन्य जीवनाच्या खाणाखुणा



छायाचित्र : अभिजीत आवटे

**कुणाला खरं वाटो न वाटो, पुणे आणि परिसरातही वन्य जीवन नांदत होतं. आज त्यातल्या प्राण्यांची संख्या रोडावली असली तरी अजूनही शहरात विविध प्रजातींचं अस्तित्व आहे. त्याचा हा वेध.**

▶ वन्य जीव म्हटलं की घनदाट जंगल व त्यातील वैविध्यपूर्ण सजीव सृष्टी डोळ्यांपुढे येते. एखादं अभयारण्य, देवराई किंवा रानवा तरी समोर येतो; पण पुण्यासारखं शहर तर नक्कीच नाही. अहो, चाळीस-एक लाख वस्तीच्या शहरात कसलं आलंय वन्य जीवन? फार तर काही भटकी गुरं, कुत्री आणि झालंच तर डुकरं दिसतील इथे. पूर्वी गाढवं, बकऱ्या आणि घोडे आपली हजेरी लावत असत, पण आज तेही नाहीत. एक वेळ मुंबईचं वन्य जीवन म्हटलं तर ठीक आहे. एक मोठं अभयारण्य वसलंय त्या शहरात. पण पुण्याचं वन्य जीवन म्हटलं तर वाचकांना नक्कीच आश्चर्य वाटेल. मात्र, एके काळी पुण्यात वैविध्यपूर्ण वन्य जीव होते व आजही काही प्रमाणात ते टिकून आहेत. कालपरत्वे त्यातील काही प्रजाती आज दिसत नाहीत, तर काही नव्या दिसू लागल्या आहेत. काहींची संख्या घटली आहे तर काहींची वाढली आहे. पुण्याच्या वन्य जीवनात काय बदल झाला आणि का झाला?

भारतासारख्या उष्ण कटिबंधीय प्रदेशात शहर वसण्याआधीपासून वन्य जीवांचा निवास असायचा. जसा माणूस पाणवठा शोधून वस्ती करतो तसेच प्राणीही त्या पाणवठ्याचे उपभोक्ते असतात. सर्वसाधारण वन्य जीवन म्हटलं की सस्तन प्राणी आठवतात; पण त्यात पक्षी, सरपटणारे प्राणी, भूजलचर आणि कीटकसुद्धा येतात. स्थानिक वनस्पतींबरोबर या सगळ्यांच्या उपस्थितीतून अन्नसाखळी तयार होते आणि एक परिपूर्ण परिसंस्था बनते. एखाद्या शहरात असे वैविध्यपूर्ण वन्य जीव असणं हे त्या शहराला वेगळेपण देतं. पण वस्ती वाढत जाते तशी वर्दळ आणि बांधकामं वाढतात. पाण्याचे स्रोत मानवकेंद्रित केले जातात. मूळची वनस्पती जाऊन शोभेची किंवा मानवी उपयुक्त लागवड होते आणि वन्य जीवांचा अधिवास आणि खाद्य नष्ट होत जातं. ज्या प्रजाती मानवी अतिक्रमणाला अनुकूलन करू शकतात त्यांचा टिकाव इथे लागतो, किंवा त्या पर्यायी अधिवासाच्या शोधात निघून जातात. अगदी अलीकडे, म्हणजे पन्नास-पंचाहत्तर वर्षांपूर्वीपर्यंत पुण्याची परिस्थिती वन्य जीवांसाठी अनुकूल होती, पण आज तशी राहिली नाही.

पुणे जिल्ह्यातील वन्य जीवांचा शास्त्रोक्त अभ्यास ब्रिटिश राजवटीपासून होत गेला. सरकारी गॅझेटियर (स्थलवर्णनकोश)मधून तो प्रकाशितही होत असे. संपूर्ण पुणे जिल्ह्याची नोंद त्यात होत असे. पुढे झुऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडियाचं क्षेत्रीय कार्यालय पुण्यात आल्यावर याचा सखोल अभ्यास आणि नोंद होत गेली. मधल्या काही काळात शास्त्रज्ञांपेक्षा शिकारी इथल्या वन्य जीवांकडे आकर्षित होत होते. नंतर पुण्यातील काही कॉलेज व संस्थांतील संशोधकांनी याचा अभ्यास सातत्याने केला. यात काही महत्त्वाचे अभ्यास आहेत. डॉ. हेमंत घाटे यांनी मुळा-मुठेतील माशांचा केलेला अभ्यास, प्रकाश गोळे यांनी पुण्यातील पक्ष्यांची केलेली गणना इत्यादी. १९९८-२००० च्या सुमारास काही अभ्यासकांनी शहरातील वन्य जीवनाचा व्यापक अभ्यास केला. यात प्रजातींची यादी आणि गणना केली गेली व त्यांच्या बदलत्या संख्येची कारणमीमांसाही मांडली. रानवा या संस्थेने याचा अहवाल प्रकाशित केला. या सर्व अभ्यासांतून असं दिसतं, की भारतातील अनेक मोठ्या शहरांपेक्षा पुण्यात एके काळी कमालीचं वैविध्यपूर्ण वन्य जीवन होतं. असं असण्याची काही महत्त्वाची कारणं आहेत, त्यांतील एक मुख्य कारण म्हणजे पुण्याची भौगोलिक परिस्थिती.

समुद्रपातळीपासून सरासरी ५६० मीटर उंचीवर, पश्चिम घाटाच्या पूर्वेला, दख्खन पठारावर वसलेल्या पुणे शहराला सम हवामान लाभलं आहे. पश्चिम घाटातील मुबलक पर्जन्यवृष्टीमुळे तिथे उगम पावणारे अनेक नदी-नाले पुण्याच्या सभोवताली आहेत. मुळा आणि मुठेचा संगम शहरात आहे. सह्याद्री पर्वतावर आणि त्याच्या पूर्वेकडे अनेक देवराया आणि सुरक्षित वनं



छायाचित्र : हर्षद कानेटकर







**शहरातल्या टेकड्यांवर आजही शृंगी घुबड (इंडियन ईगल आऊल) आणि स्टेपी गरुड यांसारखे दुर्मिळ पक्षी दिसतात.**

आहेत. शहर आणि भोवताली टेकड्यांच्या रांगा आहेत. अशा भौगोलिक परिस्थितीतून पुण्याच्या परिसरात अधिवासांचं विलक्षण वैविध्य निर्माण झालं. एका अभ्यासात यांचं सात प्रकारांत वर्गीकरण केले आहे : वन क्षेत्र, झुडपी माळरानं, गवताळ प्रदेश, लागवड केलेल्या बागा, शेती, मानवी वसाहती आणि पाणथळ जागा. यातून ठराविक वनस्पती आणि त्यांच्याकडे आकर्षित होणारे कीटक, भूजलचर, सरपटणारे प्राणी आणि पशुपक्ष्यांना आसरा व अन्न मिळत असे. पुण्याची लोकसंख्या कमी होती तेव्हा ते वाडे आणि सायकलींचं शहर म्हणून ओळखलं जायचं. औद्योगिक वसाहत मर्यादित असल्यामुळे हवा, पाणी व मातीचं प्रदूषण कमी होतं. नदी-तलावांतील पाणी जलचरांना योग्य होतं. टेकड्यांवर अतिक्रमणं नव्हती, बांधकामं नव्हती आणि वर्दळ कमी होती. अशा विविध प्रकारे नटलेल्या पुणे शहरात साहजिकच खूप हिरवाई होती आणि त्याला आकर्षित होऊन वन्य जीव येत असत.

**टेकड्यांवरील सजीव सृष्टी**

टेकड्यांनी पुण्याला एक वेगळेपण दिलं आहे. फार थोड्या शहरांत टेकड्या आहेत, पण पुण्याला चहुबाजूंनी टेकड्यांनी वेढलं आहे. कात्रज, कोंढवा, वानवडी, सुस, बाणेर, बावधन अशा ठिकाणी छोट्या-मोठ्या टेकड्या तर आहेतच, शिवाय अगदी गावातही पर्वती, तळजाई, वेताळ या टेकड्या आहेत. काही शतकांपूर्वी या टेकड्यांवर घनदाट झाडी होती; पण मुगल आक्रमणांच्या काळात तिथे मोठ्या प्रमाणात जंगलतोड झाल्याची नोंद आहे. अलीकडच्या काळात टेकड्यांवर वनीकरण चालू झालं आणि त्यात प्रामुख्याने विदेशी झाडं व एकसुरी लागवड केली गेली. त्यामुळे टेकड्यांचं स्वरूप बदलून गेलं. तरीही, रस्ते नसल्याने आणि मानवी वावर कमी असल्याने इथे अनेक प्रकारचे पशुपक्षी येत असत. निशाचर प्राण्यांचा इथे वावर होता. कात्रज आणि पर्वती पाचगावपर्यंत तरस (हाईना) येत असल्याची नोंद आहे. विविध प्रकारचे उंदीर आणि साप इथे असत. उंदरांच्या संख्येवर सापांचं नियंत्रण असे आणि सापांवर घुबड आणि गरुडांचं. घुबडं रात्रीचे शिकारी, तर गरुड दिवसाचे. आजही इथे शृंगी घुबड (इंडियन ईगल आऊल) आणि स्टेपी गरुड यांसारखे दुर्मिळ पक्षी येत असतात. रानडुक्कर, भेकर, साळिंदर, घोरपड आणि काळ्या मानेचे ससे (जंगली ससे) यांचा वावर अगदी गावातल्या टेकड्यांवरही होता. कीटकांचे अनेक प्रकार होते. अनेक प्रकारची फुलपाखरं, पतंग, कोळी, चतुर आणि माशांचा इथे वास होता. पौड रस्त्याला वेताळ टेकडीचा एक भाग येतो, त्यावर म्हातोबाचं देऊळ आहे. आजही वर्दळ तशी कमी असल्याने अगदी अलीकडे इथे भेकर दिसायचे. भोवतालच्या टेकड्यांवर तर चौसिंगा (फोर होर्न्ड ॲन्टिलोप) येत असल्याची नोंद आहे. सुस गावाच्या पुढे लवळे येथील एका टेकडीवर सिम्बॉयोसिस

विद्यापीठ आहे. गेल्या वर्षी आम्ही तिथे सर्वेक्षण केले असता २७ प्रकारची फुलपाखरं, ६ प्रकारचे सस्तन प्राणी, १० भूजलचर, २१ सरपटणारे प्राणी आणि १२० प्रकारचे पक्षी आढळले. सुदैवाने या संस्थेत त्यांना संरक्षण देऊन त्यांचं संवर्धन केलं जात आहे.

अशा या पुण्याच्या टेकड्या! फक्त मानवी वर्दळ मर्यादित ठेवली आणि वनस्पतींना तारलं की जैव विविधतेला कसा बहर येतो.

पण टेकड्यांवर इतके प्राणी असताना माणूसही तिथे आकर्षित झाला. त्यामुळे मधल्या काळात शिकार वाढली. त्यात रानडुक्कर, घोरपड, जंगली ससे, भेकर यांची कत्तल झाली. आज शिकार बंद झाली असली तरी टेकड्यांवर वर्दळ वाढली आहे, अतिक्रमण झालं आणि भटक्या कुत्रांची संख्या वाढली आहे. त्यामुळे सस्तन प्राणी गेले, सरपटणारे प्राणी कमी झाले आणि अन्नसाखळी तुटल्याने  शिकारी पक्षी येईनासे झाले. आता टेकड्यांवर खारी, कावळे, घारी, मैना, बुलबुलसारख्या शहरी पक्ष्यांनी जागा बळकावली आहे. दिवसेंदिवस मोरांची संख्याही वाढत चालली आहे. वेताळ टेकडीवरचा प्रस्तावित रस्ता जर झाला तर उर्वरित कीटक आणि पक्षी-प्राणीही या टेकड्यांवरून नाहीसे होणार हे निश्चित.

**पाणवठ्याचे निवासी**

पुण्याला जशा मुबलक टेकड्या आहेत तसे पाणवठेही खूप लाभले आहेत. हे पाणवठे नैसर्गिक नसून मानवनिर्मित आहेत. पाण्याभोवती एक वेगळी परिसंस्था होते आणि त्याला आकर्षित होणारे वन्य जीव तिथे आढळतात. राम नदीच्या बांधामुळे पाषाण तलाव बनला. पेशव्यांच्या काळात अनेक पाणीसाठे केले गेले. पर्वती पायथ्याच्या तळ्यात सारस क्रौंच येत असत असं सांगतात. त्यामुळे सारसबाग असं त्याचं नाव पडलं. कात्रज, आंबेगाव, कोंढवा, लोहगाव इथेही तळी आहेत. पूर्वी त्यांच्याभोवती अल्प वस्ती असल्याने पाणी स्वच्छ होतं आणि मुबलक जलचर असायचे. पाणथळ पक्ष्यांना मेजवानी होती आणि इथे दुरून पक्षी येत असत. हिवाळ्यात लडाख व हिमालयातून पाषाण तलावावर काही पक्षी यायचे. चक्रवाक (रडी शेलडक) आणि पट्टकदंब (बार हेडड गूस)सारखे स्थलांतर करणारे पक्षी पुण्याचा पाहुणचार घेऊन जायचे. चक्रवाक आजही इथे येतात, परंतु त्यांची संख्या रोडावली आहे. अनेक प्रकारच्या बदकांचे थवे पाषाण तलावात असायचे, त्यामुळे दलदली ससाण्यांना (मार्श हॅरियर) मेजवानी असे. एके काळी तलावाच्या परिसरात वनमांजर (जंगल कॅट) हा दुर्मिळ प्राणी यायचा. आता हा प्राणी पुण्यातच काय पण इतर ठिकाणीही दुर्मिळ झाला आहे. अत्यंत देखणा असा बोनेलीज गरुडाने पाषाण तलावाच्या काठी आपलं घरटं केल्याची नोंद आहे. एखाद्या ठिकाणी शिकारी पक्ष्यांचं घरटे असणं हे सशक्त परिसंस्थेचं लक्षण

**रानडुक्कर, भेकर, साळिंदर, घोरपड आणि काळ्या मानेचे ससे (जंगली ससे) यांचा वावर पूर्वी सर्रास होता. त्यांची संख्या कमी झाली असली तरी आजही कधीतरी साळिंदरासारखे प्राणी दर्शन देतात. तर दिवे घाट परिसरात आजही कोल्ह्यांचा वावर आढळतो.**





आहे. पण काही वर्षांपूर्वी सुशोभीकरणाच्या नावाखाली पाषाण तलावाभोवती चुकीची लागवड आणि काठांचं बांधकाम केलं गेलं. तसेच, प्रदूषणाकडे दुर्लक्ष केल्याने पाण्यात जलपर्णी आणि पाणकोबी फोफावली आहे. आज पाषाण तलावाचा परिसर इतका बदलला आहे की पूर्वी येत असलेले अधिवास संलग्न किंवा खाद्य उपलब्धतेशी संलग्न पक्षी येणं बंद झालं आहे. वनमांजर तर इथून कधीच गायब झालं आहे. चुकीच्या मानवी हस्तक्षेपाने एका अद्वितीय नैसर्गिक आकर्षणाला पुणेकर कायमचे मुकले !

पुण्यात बांधकाम वाढत गेलं आणि त्यासाठी दगडांची मागणी वाढली. शहरात आणि भोवती

सुभग, सूर्यपक्षी, खाटिक, वटवट्या असे झाडांतील पक्षी दिसतात. काठावर मुंगसांचं वास्तव्य आहे. इथे एक सुंदर काळ्या-पांढऱ्या खंड्यांची (पाईड किंगफिशर) जोडी आहे. हा पक्षी स्वच्छ पाण्याच्या ठिकाणीच आढळतो. मॉडेल कॉलनीच्या तळ्याला छोटेखानी अभयारण्यच म्हणता येईल! भर वस्तीतील हे वन्य जीवन पुण्याची शोभा किती वाढवतं! वेताळ टेकडीवरील खाणीतही अशा प्रकारची विविधता आहे. बदकं, वारकरी पक्षी, पाणकावळे, पाणथळ जागेचे साप, बेडूक, चतुर, फुलपाखरं अशा अनेक प्रजाती इथे दिसतात- नांदतात; परंतु टेकडीवरच्या वाढत्या वर्दळीने दिवसेंदिवस त्यांची संख्या रोडावत जात आहे.


छायाचित्र : माधवी कवी



**पूर्वी खडकवासला धरणापासून पर्वतीच्या नाल्यापर्यंत स्मूथ कोटेड ऑटर नावाचा दुर्मिळ प्राणी सापडत असे. मुंगसासारखा दिसणारा हा सस्तन प्राणी आता फक्त कोकणातील काही भागांत आढळतो. तसंच रानमांजरंही पुण्यातून नाहिशी झाली आहेत.**

दगडाच्या खाणी झाल्या. उत्खनन संपलं की तिथल्या पोकळीत पावसाचं पाणी साठून तळी तयार होतात. वेताळ टेकडी, मॉडेल कॉलनी, विश्रांतवाडी या ठिकाणी अशाच प्रकारची तळं आहेत. मॉडेल कॉलनीतील तळं त्यामानाने सुरक्षित आहे आणि वर्दळ नियंत्रित आहे. त्यामुळे आजही इथे चांगलं वैविध्य आहे. वारकरी पक्षी, पाणकावळे, पाणकोंबडी, तीन प्रकारचे खंड्या (किंग फिशर), चार प्रकारची बदकं असे पाणथळीचे पक्षी इथे आहेत. तळ्याभोवती टिटवी, तांबट, धनेश, भारद्वाज,

दापोडीतील कॉलेज ऑफ मिलिटरी इंजिनियरिंग (सी.एम.ई.)मध्ये दोन मोठी तळी आहेत. काही वर्षांपूर्वी या संस्थेने इकॉलॉजिकल सोसायटीच्या प्रकाश गोळे यांच्या सल्ल्याने पाणथळ पक्षी आकर्षित होतील असा अधिवास तयार केला. हा प्रयोग यशस्वी झाला आणि आज या तळ्यांत तीसपेक्षा जास्त प्रकारचे पक्षी निवासी आहेत! पिंपरीतील टाटा मोटर्स कंपनीतही असाच एक तलाव आहे.

काही वर्षांपूर्वीपर्यंत मुठा नदीपात्रात नाल्यासारख्या

भिंती बांधल्या नव्हत्या. त्यामुळे पाणी वाढलं की संपूर्ण पात्रात पसरायचं. नदीकाठावर ठराविक वनस्पती होती. पाणी अधिक स्वच्छ होतं आणि पात्रात रस्ता नव्हता. त्यामुळे मुठेचं पात्र वन्य जीवांसाठी एक उत्तम अधिवास होता. संभाजी उद्यानाच्या काठावर घोरपडींचा वावर असल्याचं सांगितलं जातं. त्यांची शिकार केली जायची. शिकारीचं प्रमाण वाढलं आणि नदीपात्रात घोरपडींचा वावर संपला. पात्रातून पूर्वी जकाना (ब्राँझ विंग जकाना), कुदळ्या (आयबिस), चमचा (स्पूनबिल), वंचक (हेरन), नदी सुरय (रिव्हर टर्न), पाणकावळे, टिटवी, असे पक्षी दिसायचे. आज त्यांही संख्या रोडावली आहे. पात्र संकुचित झाल्याने बाजूने झुडपं

पक्षी आहेत, पण अधिवास किंवा खाद्य संलग्न अशा विशिष्ट प्रजाती येणं बंद झालं आहे. संपूर्ण मुळा-मुठेत अनेक प्रकारचे बेडूक, खेकडे आणि मासे असायचे. त्यामुळे इथे पूर्वी मासेमारी चालत असे. पण सांडपाणी वाढत गेलं आणि धरणातून विसर्ग कमी झाला. त्यामुळे नदीत बेसुमार प्रदूषण झालं. आता एखाद-दोन विदेशी प्रजातींचे मासे इथे आहेत. जलचरांचं वैविध्य मात्र नष्ट झालं.

पूर्वी खडकवासला धरणापासून पर्वतीच्या नाल्यापर्यंत एक अतिशय दुर्मिळ असा प्राणी दिसायचा. त्याचं नाव स्मूथ कोटेड ऑटर. मराठीत त्याला उदमांजर किंवा पाणमांजर म्हणतात. मुंगसासारखा दिसणारा, पाण्याजवळ




**मॉडेल कॉलनीच्या तळ्याला छोटेखानी अभयारण्य म्हणता येईल. इथे वारकरी पक्षी, पाणकावळे, पाणकोंबडी, तीन प्रकारचे खंड्या, चार प्रकारची बदकं असे पाणथळीचे आढळतात.**






आणि गवत पसरलं. तिथे आता मुनिया, लार्क्स आणि बुशचॅटसारख्या पक्ष्यांना योग्य अधिवास झाला आहे. बंडगार्डन पुलाच्या पूर्वेला, मुळा-मुठेच्या पात्रात आजही अनेक प्रकारचे पक्षी येतात. काही वर्षांपूर्वी प्रकाश गोळे यांनी पुणे महानगरपालिकेच्या मदतीने हे क्षेत्र पक्ष्यांसाठी आरक्षित केलं होतं. भारतातील ज्येष्ठ पक्षितज्ज्ञ डॉ. सालिम अली यांच्या हस्ते त्या जागेचं 'मुळा-मुठा पक्षी अभयारण्य' असं नामकरण केलं गेलं. कित्येक वर्षं हे पुण्यातील एक मोठं आकर्षण होतं. पण आता इथे कचरा डेपो बनला आणि सांडपाणी सोडलं जातं. आज इथे

राहणारा हा सस्तन प्राणी आता फक्त कोकणातील काही भागांत आढळतो. आंतरराष्ट्रीय वन्य जीव संवर्धन संस्थेने (आय.यू.सी.एन.) या प्राण्याला 'व्हल्नरबल'चा दर्जा दिला आहे. याचा अर्थ ही प्रजाती लुप्त होण्याचा मोठा धोका आहे.

पुण्यातील नदीपात्र, नाले आणि ओढे हे इथल्या वन्य जीवांसाठी एक महत्त्वाची भूमिका बजावतात. शहरात रात्रीच्या वस्तीची ठिकाणं आणि अन्न उपलब्ध असलेल्या जागा वेगळ्या असल्याने प्राण्यांना हा प्रवास



छायाचित्र : आकाश पाटील



**सिंहगड आणि मुळशी परिसरात खवल्या मांजर (पँगोलिन) हा दुर्मिळ झालेला प्राणी यायचा. खवल्यांसाठी त्याची शिकार झाल्यामुळे तो संपून गेला. पेठांमध्ये पूर्वी मुंगसांचाही सर्रास वावर होता.**

रोज करावा लागतो. यासाठी त्यांना पात्रातील मार्ग सुरक्षित असतो आणि प्राणी त्यांचा नित्य वापर करतात. याला कॉरिडॉर' असं म्हणतात. त्यामुळे नदीपात्र आणि ओढ्यातून जर रस्ते बनले किंवा वर्दळ वाढली तर प्राण्यांना ते बंद होतात आणि त्यामुळे ते विस्थापित होतात.

**मानवी वसाहतीत काय सापडतं?**

काही प्रजातींनी मानवी हस्तक्षेपाचं यशस्वी रीतीने अनुकूलन केलं आहे. गावठाणातील देवळात आणि जुन्या वाड्यांत वड, पिंपळ, चिंच, उंबर, आंबा असे मोठाले वृक्ष असत. शेकडो वर्षं वयाचा प्रत्येक वृक्ष हा एक स्वतंत्र परिसंस्थाच होती. असंख्य कीटकांचं ते जणू अभयारण्य असायचं. विविध पक्षी त्यावर पोसले जायचे आणि उदमांजर, वटवाघुळ व खारींना इथे निवारा मिळायचा. रस्तारुंदीत झाडं गेली आणि वाडे जाऊन मोठाल्या इमारती झाल्या. जुने वृक्ष गेले आणि त्यांच्या छत्रछायेतील सजीव बेघर झाले. रस्त्याच्या कडेने गुलमोहोर, पर्जन्य वृक्ष, पेल्टोफोरम, पिचकारी अशी शोभिवंत झाडं लावली गेली. बंगल्यांतून नारळ, पाम आणि फुलझाडं आली. चिमण्यांची आवडणारी झाडं गेल्याने त्या विस्थापित झाल्या आणि त्यांची जागा कबुतरांनी घेतली. इमारतींवर घरं करून राहण्याचं तंत्र त्यांना जमलं आणि कबुतरांनी शहरात आपली सत्ता स्थापली. वाड्यांबरोबरच जुनी देवळंसुद्धा वन्य जीवांची आश्रयस्थानं होती. जंगली महाराज रस्त्यावर पाताळेश्वर गुहांमधून काही विशिष्ट प्रकारची वटवाघळं राहायची. लक्ष्मी रस्त्यावरील बेलबागेच्या राम मंदिरात तर एक छोटीशी देवराईच होती. त्यात एक नाग राहायचा. आज इथे मुंगूस आहे. सदाशिव, नारायण, शनिवार पेठेत सलग वाडे होते, त्यांतून उदमांजरं (सिवेट) आणि मुंगसांचा वावर असे. उदमांजरं मुलांना मारतात, अशा गैरसमजुतीमुळे त्यांना मारलं जात असे आणि त्यामुळे गावठाणातून त्यांचं वास्तव्य संपलं, पण राम नदीच्या पात्राभोवती त्यांची संख्या वाढली आहे. त्यांचं खाद्य कमी झाल्याने बाणेर व बावधन भागातील इमारतींत घरात घुसण्याचे प्रकार होत आहेत. शहरातील कचरा वाढला तसे उंदीरही वाढले. कचरा आणि उंदरांची मेजवानी मिळण्याने मुंगसांची संख्या वाढली. पुण्यात पूर्वी तीन प्रकारच्या खारी आणि उंदरांचे दहा प्रकार असल्याची नोंद आहे. आता इथे फक्त एकाच प्रकारची खार आहे. तिचीही संख्या वाढली आहे. कारण शिकारी पक्षी इथे येईनासे झालेत.

पुण्याचं अजून एक वैशिष्ट्य म्हणजे इथल्या प्रचंड मोठ्या ब्रिटिशकालीन संस्था. पुणे विद्यापीठ, कृषी विद्यापीठ, राष्ट्रीय रक्षा अकादमी (एन.डी.ए), वैकुंठ स्मशानभूमी, मध्यवर्ती कारागृह (जेल) अशा संस्थांना मोठालं आवार, भरपूर झाडी आणि अल्प मानवी वस्ती आहे. आजही इथे काही प्रमाणात वन्य जीव आहेत. वैकुंठ स्मशानभूमी आणि मध्यवर्ती कारागृहात रोज रात्री हजारो पक्षी वास्तव्याला येतात. घारी, पोपट (पॅराकिट), मैना, चिमण्या, कावळे अशा विविध प्रजाती इथे सुखाने एकत्र नांदतात. या ठिकाणी दिवसा वटवाघळांची वस्ती असते. पूर्वी पुण्यात वटवाघळांच्या १६ प्रजाती असल्याची नोंद आहे, पण आज त्यांतल्या काही गायब आहेत. सुमारे सत्तर वर्षांपूर्वी वैकुंठ स्मशानभूमीपाशी तरस दिसल्याची नोंद आहे. कदाचित नदीपात्राचा वापर करून ते इथे आलं असेल. पुणे विद्यापीठात उदमांजर आणि मुंगसांचं वास्तव्य आजही आहे. तिथल्या बोटॅनिकल बागेत अनेक प्रकारचे सर्प, कीटक, फुलपाखरं आणि पक्षी आहेत. मध्यवर्ती कारागृहात साप,

नाग, साळिंदर, मुंगूस आणि उदमांजरं आहेत. मोर, घुबड आणि शिकारी पक्षीही आहेत. वानर आणि माकडांची संख्या तर खूपच वाढली आहे. कारागृहात एक मोठा पाणवठा आहे, त्यात अनेक प्रकारचे पाणथळ पक्षी आहेत.

**पुण्याच्या भोवतालचं वन्य जीवन**

पुण्याभोवती डोंगर-दऱ्या, जंगलं, माळरानं, पाणवठे, शेती असे सर्व प्रकार असल्याने इथे दुरून येणारे अनेक पक्षी दिसायचे. त्यात स्टेपी ईगल, सारस क्रौंच (क्रेन), दमॉइसेल क्रौंच, व्हरडीटर फ्लायकॅचर, काही हॅरियर्स, धाविक (कोर्सर), स्किमर असे स्थलांतर करणारे अनेक पक्षी येत असत. सारस क्रौंच गेल्या कित्येक दशकांत इथे फिरकलाच नाही. धाविक हा एक देखणा, गवताळ प्रदेशाचा पक्षी आता पुण्याच्या खूप दूर सापडतो. मार्श हॅरियर्स तर पाषाण तलावापर्यंत यायचे, ते आता वीर आणि भिगवण धरणापाशी सापडतात. पुण्याभोवती अनेक पाणवठे असल्याने ब्राह्मणी घारी इथे दिसायच्या. ही देखणी, पांढऱ्या शुभ्र डोक्याची तांबूस-तपकिरी घार संथपणे आकाशातून टेहळणी करताना दिसायची.

शहराच्या ईशान्य आणि पूर्व भागाकडे पर्जन्यवृष्टी कमी होत जाते. एके काळी इथे झुडपी जंगलं आणि गवताळ प्रदेश होता. त्यात चिंकारा हा अत्यंत देखणा प्राणी मोठ्या संख्येने असायचा. आज सुपे गावाजवळ फार थोड्या संख्येत ते उरले आहेत. सासवडच्या पठारांवर लांडग्यांच्या टोळ्या हिंडत असत आणि वस्तीत येऊन पाळीव प्राण्यांना भक्ष्य करत असत. आजही इथे लांडग्यांचं वास्तव्य असल्याचं एका संशोधनात दिसून आलं आहे. नगर रस्त्यावर वाघोलीच्या परिसरातही काळ्या मानेचे ससे, कोल्हे आणि काळवीट होते. त्यांना आता रेहकुरी अभयारण्यात सुरक्षा दिली आहे. उजनी धरणाचे कालवे झाल्यावर या भागातील मोकळ्या जागा शेतीखाली आल्या आणि लांडगे व काळविटांचा अधिवास नष्ट झाला.

शहराच्या पूर्वेला सह्याद्री पर्वतांची रांग आहे. हा डोंगराळ भाग शहरीकरणाला योग्य नसल्याने इथे देवराई आणि थोडीथोडकी जंगलं वाचली आहेत. अनेक प्रकारच्या प्राण्यांना यात आश्रय मिळतो. यात काही अधिवास विशिष्ट आणि प्रदेशनिष्ठ प्रजाती आढळतात. हा डोंगराळ प्रदेश संपताच दख्खन पठाराची सुरुवात होते आणि मानवी वस्ती वाढत जाते. पण सह्याद्री पर्वताच्या वनक्षेत्रातून पठाराला जोडणारे काही वन्य दुवे, म्हणजे कॉरिडॉर उपलब्ध होते. त्यातून सिंहगड आणि मुळशी परिसरात खवल्या मांजर (पँगोलिन) हा दुर्मिळ झालेला प्राणी यायचा. याच्या खवल्यांना अंतरराष्ट्रीय बाजारपेठेत मागणी असल्याने मोठ्या प्रमाणात त्यांची शिकार झाली. आज या भागातील खवल्यामांजर संपुष्टात आलं आहे. या कॉरिडॉरमधून जंगली मांजर, बिबट्या आणि पट्टेरी वाघही कात्रजपर्यंत आल्याची नोंद आहे. आजही काही प्रमाणात असे कॉरिडॉर किंवा वन्य दुवे शिल्लक आहेत आणि प्राण्यांकडून त्यांचा वापर होत आहे; पण शहराच्या वाढत्या पसाऱ्यात हे लवकरच संपू शकतील. चांदणी चौक पूर्वी अगदी गावाबाहेर होता. त्याच्याजवळ

**शहराच्या पूर्व आणि ईशान्य भागात पूर्वी काळवीटं, तसंच चिंकारा जातीची हरणं दिसायची. मात्र अजूनही कधीतरी शहरातल्या टेकड्यांवर भेकर दिसतं.**


छायाचित्र : माधवी कवी


छायाचित्र : गुरूदास नूलकर




**शहरातल्या टेकड्यांवर मोरांची संख्या मात्र अजूनही लक्षणीय आहे.**

एक चिकनचा कारखाना होता. बाजूलाच कारखान्यातील जैविक कचऱ्याचे ढीग केले जायचे. त्याला आकर्षित होऊन तिथल्या झाडावर स्टेपी गरुडाचे थवे बसायचे. आता हा गरुड पुण्यात दुर्मिळ झाला आहे.

**बदलत्या प्रजाती**

आधी पेन्शनरांचं गाव, मग औद्योगिक शहर आणि आता आय.टी. सिटी- गेल्या पन्नास वर्षांत पुण्याची ओळख इतकी बदलली आहे. देशभरातून लोक इथे नोकरीच्या शोधात येऊ लागले. साहजिकच वस्ती, वाहनं आणि वर्दळ वाढली आणि रात्रीचा दिवस होऊ लागला. एके काळची खेडी आता शहराचा भाग झाली. कोथरूड, औंध, बाणेर, बावधनमध्ये मोठाल्या इमारती झाल्या. मोकळ्या जागा भरून गेल्या. शहरातील गोंगाट वाढला, नदी प्रदूषित झाली आणि सजीव सृष्टी धोक्यात आली. इतकी वर्षं या शहराशी नातं असलेल्या पशुपक्ष्यांना शहराचा नवा चेहरा अनुकूल राहिला नाही. काही स्थलांतर करणारे पक्षी येणं बंद झालं, तर काही निवासी पशुपक्षी निघून गेले. काही नवीनच प्रजातींना इथलं आकर्षण वाटू लागलं आणि त्यांची संख्या वाढली. अधिवासातील वैविध्य आणि अन्न उपलब्धतेशी निगडित असलेली जैव विविधता बदलली की विशिष्ट अधिवास किंवा खाद्य लागणाऱ्या प्रजाती येणं बंद होतं. शहर वाढल्याने भूरूप बदललं, वनस्पती बदलल्या. फुलं, फळं आणि कीटक बदलले. हवा आणि पाणी प्रदूषित झालं. सुशोभीकरणात ही सूक्ष्म जीवसृष्टी गेली. या सगळ्यामुळे अन्नसाखळीत मोठे बदल झाले आणि खाद्य उपलब्धता बदलली. काही प्रजातींना आज इथे खाद्य उरलंच नाही. उदाहणार्थ, गिधाडांना मेलेली गुरं मिळेनाशी झाली. पूर्वी पुण्याभोवती त्यांचे थवे बसून मेलेली जनावरं खाताना दिसायची. आता वयस्क जनावरं कत्तलखान्यात धाडली जातात. पाणमांजर आणि खवल्या मांजर हे दोन्ही अगदी शामळू प्राणी. वर्दळ आणि वस्ती त्यांना सहन होत नाही. शहराचा गजबजाट वाढला आणि त्यांचं खाद्यही मिळेनासं झालं. त्यामुळे हे दोन्ही प्राणी इथून लुप्त झाले. माळरानांवर इमारती बनल्या, त्यामुळे शृंगी घुबड आणि लार्क्स विस्थापित झाले. घराघरांतून पूर्वी धान्य उन्हात वाळवायचे. ते बंद झाल्याने चिमण्यांचा अन्नपुरवठा गेला. त्यांची झाडंही गेली आणि चिमण्या दिसेनाशा झाल्या.

शहरात आता कुत्री, डुक्कर, मुंगूस, घुशी, कावळे, घारी, मैना, कबुतरे असे प्राणी वाढले. ते मानवी हस्तक्षेप सहन करू शकले आणि बदलत्या खाद्य उपलब्धतेला जुळवून घेऊ शकले. पण शिकारी पशुपक्षी येणं बंद झाल्याने सामान्य पशुपक्ष्यांची संख्या वाढत जाते. आज उंदीर, डुक्कर, कुत्री, घारी, कावळे आणि कबुतरांनी उच्छाद मांडला आहे. साहजिकच या गोष्टीला काही अपवाद आहेत. उदाहणार्थ, ब्लॅक विंग स्टिल्ट नावाचा एक पक्षी इथे लडाखहून येऊ लागला आहे. या पक्ष्याचं विशिष्ट खाद्य असतं, जे प्रदूषित पाण्यात सापडतं. आता त्यांना पुण्यात मुबलक खाद्य मिळू लागलं आहे.

शहरीकरणाच्या रेट्यात इतर सजीवांना आपण




**दिवे घाटातल्या माळरानावर हुंदडणारी हरणं.**

घालवून लावत आहोत हे जाणवतही नाही. आपण दोन प्रकारे पशु-पक्ष्यांना घालवून लावत असतो. पहिला प्रकार म्हणजे मुद्दाम घालवणं. ज्या प्राण्यांची भीती असते त्यांना आपण जाणूनबुजून हाकलून लावतो. उदाहरणार्थ, सापांना मारलं जातं. बिबट्या, माकडं, वटवाघळांना घालवून लावलं जातं. मधमाश्यांवर औषधं मारली जातात. दुसऱ्या प्रकारात आपण प्राण्यांना नकळत घालवून लावतो. मोठे वृक्ष तोडले की कीटक, मधमाश्या, वटवाघळं असे त्यावर अवलंबून असलेले प्राणी निघून जातात. मोबाइल फोनच्या टॉवरमधून चोवीस तास लहरी उद्भवत असतात. त्याचा मधमाश्या आणि काही छोट्या पक्ष्यांना त्रास होतो. उघड्या मातीवर डांबरीकारण, कोबा किंवा सिमेंट ब्लॉक्स घातले की मातीतील कीटकांचा अधिवास संपुष्टात येतो. त्यांच्यावर जगणारे पक्षी येणं बंद होतं. शहरातील वाहतुकीचा गोंगाट, निवडणूक आणि मॅच जिंकल्यावर वाजवले जाणारे फटाके, उत्सवातील लाउडस्पीकरचा कर्णकर्कश आवाज पक्ष्यांना सहन होत नाही आणि ते शांततेच्या शोधात निघून जातात. पाण्याचे स्रोत दूषित झाले की जलचरांसाठी तो साठा अयोग्य होतो. मग त्यांचे शिकारी येणं बंद होतं. अन्नसाखळी कोलमडते आणि सामान्य प्रजाती फोफावतात. अशा प्रकारे माणसाचा सजीव सृष्टीवर डोळस किंवा अनभिज्ञपणे आघात चालू असतो.

पृथ्वीवरच्या प्रत्येक सजीवाचा मानवाला प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या उपयोग असतो. पण याच्या पलीकडे प्रत्येक सजीवाला एक मूलभूत मूल्य (इंट्रिन्सिक व्हॅल्यू) असतं. देशाच्या संविधानात 'राइट टु लाइफ' तत्त्वाने या मूलभूत मूल्याचा मान राखून सर्व सजीवांना भरतभूमीवर मानवाइतकाच हक्क दिला आहे. त्यामुळे त्यांचं संरक्षण व संवर्धन करणं ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे.

शहरात जैव विविधता उद्यान करायचं ठरवलं तर मोठी जागा आणि अफाट पैसा खर्ची पडेल. एवढं करूनही इथे प्राणी नांदतील याची खात्री नाही. पण शहरात असलेली जैव विविधता जोपासणं अधिक सोपं आहे. काही भाग त्यांच्यासाठी सुरक्षित ठेवून देणं, इतकंही केलं तरी पुरे आहे. पैसा खर्च न करता आपल्याला शहरात निसर्ग उपभोगता येईल. आज अनेक प्रगत राष्ट्रांतील शहरांत तिथल्या स्थानिक वन्य जीवांचा विचार केला जातो; पण अजून आपल्या देशात तसं होत नाही. असंच दुर्लक्ष करीत राहिलो तर आपण मोलाची नैसर्गिक संपत्ती कायमची गमावून बसू हे नक्की.

■ **गुरूदास नूलकर**
९८२२०३४५७९
gurudasn@gmail.com

(या लेखासाठी छायाचित्रं उपलब्ध करून दिल्याबद्दल अभिजीत आवटे, माधवी कवी, पंकज आनंद, आदित्य क्षीरसागर, आकाश पाटील आणि हर्षद कानेटकर यांचे आभार)